प्रेसनोट दि.२६/०३/२०१९

## दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर.

## दत्तवाडी पोलीसांच्या मार्फत हरवलेल्या बॅगमधील सोन्याचे दागिने,पैसे व महत्वाची कागदपत्रे मुळ मालकास परत

पुण्यातील प्रसिद्धदगडुशेठ हालवाई गणपतीचे दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोप-यातुन लोकांची गर्दी होत असते. त्याच प्रमाणे दि. २३/०३/२०१९ रोजी मुंबई येथे नोकरीस असलेले श्री. अनिल चव्हाण मुळ रा. उरळीकांचन, पुणे हे त्यांचे पत्नीसह पुण्यामध्ये फिरावयास आले असतांना दगडुशेठ हालवाई गणपतीचे दर्शनासाठी हे दोघे पती पत्नी आले होते. पुण्यातील गर्दीचा अंदाज घेऊन तसेच सोने हिसकावुन चोरी करण्याच्या घटनांमुळे या दोघे पती पत्नींनी अंगावरील दागिणे त्यांचे जवळ असलेल्या बॅग मध्ये काढुन ठेवले, तसेच बॅग मध्ये त्यांच्या इतर महत्वाच्या वस्तु कागदपत्रे देखील होती. दगडुशेठ गणपतीचे दर्शन घेऊन हे दोघे पती पत्नी आप्पा बळवंत चौकातुन बाल गंधर्व येथे जाण्या साठी रिक्षा मध्ये बसले व रिक्षानेते बालगंधर्व या ठिकाणी उतरले. उतरल्यानंतर तो रिक्षावाला तेथुन निघुन गेला.

श्री.अनिल चव्हाण यांना लगेच लक्षात आले की, आपली बॅगत्या रिक्षात राहीली का कोठे विसरली त्यांना लक्षात येत नव्हते. त्या नंतर त्यांनी त्यांची बॅग मिळविण्याचा प्रयत्न चालु केला. त्यांनी प्रथम पुणे पोलीसच्या लॉस्ट ॲण्ड फाउंड मध्ये त्यांनी त्यांच्या बॅग हरवली असले बाबत तक्रार नोंद केली व त्या बाबत बालगंधर्व पोलीस चौकी येथे माहिती दिली. त्यांनी प्रथम रिक्षा चालकाचा शोध घेण्याचा निर्णय घेतला व बालगंधर्व चौकातील सीसीटीव्ही फुटेज पाहण्याकरीता बालगंधर्व चौकीतील पोलीसांना विनंती केली परंतु बालगंधर्व येथील सीसीटीव्ही कॅमेराचे कंट्रोल शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे असल्याने त्यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे जाणे बाबत सांगितले.त्यानंतर त्यांनी दि. २४/०३/२०१९ रोजी शिवाजीनगर येथे जाऊन सीसीटीव्ही फुटेज पाहीले असता त्यांना ज्या ठिकाणाचे फुटेज पाहावयाचे होते ते त्यांचे कडे उपलब्ध नव्हते,परंतु त्यांनी त्यांची बॅग मिळविण्याचे प्रयत्न येथे नथांबवता त्यांनी आप्पा बळवंत चौक येथील खाजगी दुकानांचे मालकांना विनंतीकरुन सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली परंतु काही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. त्यानंतर ते विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गेले व त्यांचे सोबत घडलेली सर्व घटना सांगुन सीसीटीव्ही आप्पा बळवंत चौकातील सीसीटीव्ही फुटेज पाहण्याची विनंती केली असता त्यांना त्या रिक्षाचा नंबर समजला. त्यानंतर त्यांनी त्या रिक्षा बाबत ऑनलाईन ॲप्लीकेशनद्वारे रिक्षा चालकाची मिळवली त्या रिक्षाचालकाने ओरा ॲटोमोबाईल येथुन सर्व्हीसिंग केली असल्याने तेथुन रिक्षाचालकाचा मोबाईल नंबर मिळवला व त्यांचेशी संपर्क साधुन त्यांची बॅग रिक्षात राहीली असल्याच`त्यांना सांगितले. रिक्षा चालकयांनी त्यांना दोन दिवस बाहेर गावी आलो असल्याचे सांगितले.

रिक्षाचालक श्री. बाळु नथु दारवटर वय ५१ वर्षे हे जनता वसाहत, पुणे येथील रहिवासी असल्याने सामाजिक कार्यकर्ते श्री. कैलास दारवटकर यांचेसह दि. २५/०३/२०१९ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे सदरची बॅग घेऊन आले व त्यांनी सांगितले की, माझी रिक्षा मी नेहमी प्रमाणे माझे घराजवळ पार्क करुन दोन दिवसा करीता बाहेरगावी गेले होतो, त्यांना त्यांच्या रिक्षा मध्ये बॅग राहीली असल्याचे लक्षात सुद्धा आले नव्हते परंतु श्री. बाळु नथु दारवटर हे प्रामाणिक रिक्षाचालक असल्याने त्यांनी ज्या माणसाची बॅग आहे त्या माणसाने फोन केला असल्याचे सांगितले व तो फोन नंबर दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. देविदास घेवारे साहेब यांना दिला वहारविलेल्या वस्तु पाहील्यावर त्या किती किंमती आहेत व पुन्हा प्राप्त करणे किती जिकरीचे आहे. याची जाणीव असल्याने श्री.देविदास घेवारे यांनी तातडीने आपल्या बरोबरील स्टाफच्या माध्यमातुन श्री. अनिल चव्हाण यांचेशी संपर्ककरुन त्यांची बॅग मिळाली ती घ्यायला दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले व श्री. अनिल चव्हाण यांना रिक्षा चालक श्री. बाळु नथु दारवटर यांच्या हस्ते ती बॅग परत देण्यात आली.

हरवलेली बॅग मिळवुन देण्या करीता दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. देविदास घेवारे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस उप-निरीक्षक कुलदीस संकपाळ, पोलीस कर्मचारी तानाजी निकम, रविंद्र फुलपगारे, सुधीर घोटकुले यांनी सहभाग घेतला.



**(देविदासघेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक,
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर